४.

# साक्षी

- छाया महाजन

## परिचय -

छाया महाजन (१९४९)

जन्म - काळेगाव, जि. अहमदनगर.

डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात इंग्रजी भाषासाहित्याच्या प्राध्यापक. काही काळ या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी त्या कार्यरत होत्या.

सामाजिक भवतालाचे वास्तववादी चित्रण त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून पाहायला मिळते. स्त्रियांचे विविध प्रश्न, समस्या शब्दांकित करतानाच माणसातील विविध वृत्ती-प्रवृत्ती यांशिवाय वैविध्यपूर्ण विषयांवरचे लेखन त्यांच्या साहित्यात पाहावयाला मिळतं.

'मुलखावेगळा', 'यशोदा', 'नकळत', 'ओढ', 'एकादश कथा', 'राहिलो उपकाराइतुका', 'अज्ञात' आदी कथासंग्रह ; 'मोरबांगडी', 'पाण्यावरचे दिवे', 'दशदिशा', 'गगन जीवन तेजोमय', 'कोलावरी डी' आदी ललितगद्यसंग्रह; 'कॉलेज', 'मानसी', 'तन अंधारे', 'होरपळ' आदी कादंबऱ्या; 'इवलेसे रोप', 'भोवरा', 'रक्ताचा रंग एक', 'फुलांच्या गोष्टी' आदी बालसाहित्य, यांशिवाय प्रौढशिक्षणपर साहित्य, भाषांतरे, संशोधनपर लेखन अशा विविध प्रकारांत लेखन करणाऱ्या सुप्रसिद्ध साहित्यिक म्हणून सुपरिचित.

महाराष्ट्र शासन उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, वि. स. खांडेकर पुरस्कार, अंकुर वाङ्मय पुरस्कार, मराठी वाङ्मयासाठीचा स्वातंत्र्यसेनानी विनायकराव

चारठाणकर हा पुरस्कार, तसेच सामाजिक, शैक्षणिक कार्यासाठी मराठवाडा गौरव पुरस्कार आणि साहित्य क्षेत्रातल्या कार्यासाठी मराठवाडा भूषण पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित.

प्रस्तुत कथा 'राहिलो उपकाराइतुका ' या कथासंग्रहातून घेतलेली असून, तीत निसर्गाच्या अनाकलनीय रूपाचे दर्शन घडते. माणसाने निसर्गाला कितीही बांध घालण्याचा प्रयत्न केला, तरी निसर्गाला माणूस बांध घालू शकत नाही. तो आकलनाच्या कितीतरी पलीकडचा आहे. याचे वास्तवदर्शी चित्रण 'साक्षी' या कथेतून केले आहे.

---

**समुद्र**किनाऱ्याला लागूनच्या मोठ्या बंगल्यात संध्याकाळी आजूबाजूच्या बंगल्यातली पिलावळ जमा झाली होती. त्यात घरगड्यांची मुलेही होती. मोठ्या थोरल्या पुढच्या बागेत पिंपळाला पार बांधलेला होता आणि तिथे मथूआजी पोरांच्या घोळक्यात मश्गूल बसली होती. ती बोलत होती. तिची- म्हातारीची मान लपलप हलत होती. ती बोळक्या तोंडाने गोष्ट सांगत होती. संध्याकाळची फिकी, पिवळी उन्हं तिच्या चेहऱ्यावर चमकत होती. तिचा गोरा-गुलाबी-सोनेरी चेहरा चमचमत होता. तिच्या हलत्या मानेमुळे तो जास्त चमकून उठत होता किंवा पांढऱ्या चमकदार केसांमुळे. तिच्या मांडीला खेटून नीलांबर बसला होता. सोबत पिंकू, रिमा, राजलक्ष्मी, गोटू, विनी, रोहन आणि माळीबाबा बसले होते. माळीबाबाही मथूआजीची गोष्ट लक्ष देऊन ऐकत होते. मुलांचे चेहरे ताणलेले आणि उत्सुक होते. नीलांबरचीच आजी असल्याने त्याच्या चेहऱ्यावर थोडा अधिकारही होता. ही गोष्ट तिने पूर्वी एकदा सांगितलेलीच होती; पण आजी दर वेळी त्यात थोडा बदल करे. नीलांबर हनुवटीला हात देऊन मोठ्या डोळ्यांनी गोष्ट जणू पीत होता. आजी सांगत होती,

"तर नाचताना परीची चूक झाली. तिची पावलं वेगळी पडली. घुंगरांच्या आवाजानं तबल्याची लय बिघडली. रसभंग झाला. देव संतापले. त्यांनी नर्तिकेला जवळ बोलावले आणि शाप दिला की, तू पृथ्वीलोकात जाऊन पडशील. तिच्यावर मनस्वी प्रेम करणारा सागर घाबरला. त्याच्या गळ्यातले गाणारे सूर आटून गेले. त्यांची जागा संतापाने घेतली. मुठी आवळून तो उभा राहिला. त्याचा राग, त्याचा त्वेष त्याच्या उमद्या तरुण चेहऱ्यावर उमटत होता. देवाने त्याच्याकडे पाहिले. मात्र, त्यांच्या लक्षात

यायला वेळ लागला नाही, माझ्या दरबारातला गायक तू? तुझी एवढी हिंमत? तूही हिच्या मागे पृथ्वीवर जा; पण तू कितीही पळालास तरी तुझी इच्छा सफल होणार नाही. तुला माघार घ्यावी लागेल आणि एका जागीच थांबावे लागेल.''

पारावर एक गूढ वातावरण तयार झाले होते. दहा-बारा उत्सुक डोळे आजीवर खिळले होते. तिकडे गोष्ट रंगात आली होती. घराच्या खिडकीतून नीलांबरचे पप्पा हे बघत होते. त्यांच्या कपाळावर आपोआप आठ्या पडल्या. बायकोकडे रागाने पाहत ते म्हणाले.

''हे बघ. नील पुन्हा जाऊन बसलाय गप्पा ऐकायला. आई त्याच्या सवयी बिघडून टाकील.''

''लहान आहे अजून. सगळीच छोटी मुलं बसली आहेत ना ऐकायला?''

''लहान? नऊ वर्षांचा आहे. लहान नाही. त्याचं संस्कार होण्याचं वय आहे. मथूमावशी त्याला चटपटीत, कल्पनारम्य गोष्टी सांगत असणार! निरुपयोगी...''

''तुम्हालाही सांगायच्या ना? तुम्ही फार चवीनं सांगता...''

''माझी गोष्ट वेगळी. आमचा काळच वेगळा होता. त्या वेळी या असल्या स्वप्नरंजित गोष्टींचं कौतुक वाटायचं. त्या खऱ्या वाटायच्या. आमचं जग या गोष्टींतून तयार झालं. जगाचे टक्केटोणपे यात कुठं सांगितलेत? शिवाय आता नवीन शास्त्रं आलीत. किती तरी गोष्टींची कोडी सुटली आहेत. अनेकांची सुटतील. हे पोरगं मात्र स्वप्नाळू डोळ्यांनी बघायला जाईल आणि धोका खाईल!''

नीलांबरच्या आईला हे नवीन नव्हते. त्यामुळे त्यांची नेहमीची बडबड सुरू झालिये, म्हणून त्या दुर्लक्ष करू लागल्या. पप्पा चिडले. त्यांनी खिडकीतून जोरात हाका मारायला सुरुवात केली. पारावरच्या गूढ वातावरणाला छेद बसला. ते वलय भंगले. त्यांच्या जगात अस्वस्थ चुळबूळ झाली; पण नीलांबर हलायला तयार नव्हता. विनीने त्याला हाताने हलवले. 'जा, तुझे पप्पा बोलावताहेत,' ती आग्रही स्वरात म्हणू लागली. तो उठून गेला असता तर तो जाण्याने त्या सगळ्यांना पुन्हा गोष्टीच्या आकाशात जाता आले असते.

शेवटी कांचन बाहेर आली. वडील फार रागावण्यापूर्वी नीलांबरला घरात नेणे आवश्यक होते. नीलची मोठी बहीण म्हणून ते तिचे कर्तव्य होते. हे करावेच लागणार, हेही तिला ठाऊक होते.

"काय गं कांची? झालं का जेवायचं?" आजीने विचारले. मुलांचे डोळे आपोआप तिच्याकडे वळले आणि तिथेच थांबले. नितळ गोरा रंग, निळ्या झाकेचे सुंदर मोठे डोळे, दाट, रेशमी भुरे लांब मोकळे सोडलेले केस, सुबक लांबसडक बांधा, उत्तम उंची, संगमरवरी देवाच्या मूर्तीसारखे सुबक पाय, हातांची बोटं... मुले पुन्हा गोष्टीत गेली.

"चल रे नील, पप्पा केवढे चिडलेत, त्यांना अजिबात आवडत नाहीत असं गोष्टी ऐकणं, पण तू म्हणजे ना."

तिने नीलला जवळजवळ ओढूनच काढले. आता अभ्यासाविषयी ऐकावं लागणार हे त्याला कळून चुकले.

दिवाणखान्यात पप्पांनी त्याला बोलावले. ऑर्डर. तो भव्य शरीरयष्टीच्या, देखण्या वडिलांच्या रागावलेल्या चेहऱ्यापुढे उभा राहिला.

"हे कामाला येणार आहे काऽरे? कितीदा सांगायचं खेळायला कम्युनिटी प्ले ग्राऊंडवर जा म्हणून. सगळी निर्मिती-शक्ती असल्या बकाल गोष्टी ऐकत घालवायची. अरे, नवीन शास्त्रं येताहेत. नव्या गोष्टी शिका. माणसानं केवढी प्रगती केलीय, सगळा समाज ढवळून निघालाय, वेगळ्या पद्धतीची आयुधं आलीत. एक वेगळा समाज जन्माला येतोय. शास्त्रीय जाण असलेला."

नीलांबरचे या बोलण्याकडे लक्ष असले, तरी डोळे खिडकीतून दिसणाऱ्या पाराकडे होते.

उतरत्या उन्हाचे पट्टे तुकड्या-तुकड्यांनी पिंपळावर पसरले होते. नवीन झळाळीची पाने वाऱ्याने हलताना सोन्याचे लवलवते तुकडे असावेत असे वाटत होते. तेवढ्यात कांचन तिथे आली.

"मी घेते पप्पा त्याचा अभ्यास. तुम्हांला दुपारी रेड्डीकाकांचा फोन आला होता. लाइट हाऊसजवळ काही तरी दुरुस्ती निघालीय म्हणून."
"केव्हा आला होता ?"

"दोन एक तास झाले. तुम्ही बाहेर गेला होता. तुम्हाला तिकडे बोलावलंय." ठीक आहे म्हणत पप्पा उठलेच. तसा नीलांबर एकदम म्हणाला, "मी येतो पप्पा तुमच्याबरोबर. मला तिथला बीच फार आवडतो."

विशाखापट्टणम्‌कडून खाली पश्चिम किनाऱ्याला लगत जाणाऱ्या पट्ट्यावर थोडेसे नदीच्या मुखाजवळच फार मोठा धक्का बांधला होता. तरी पंधरा-वीस वर्षांखाली असेल. नीलांबरने हे ऐकलेले होते. बोटीच्या दुरुस्तीसाठी हा धक्का सोयीचा होता. त्याचे पप्पा इंजिनीअर होते.

नीलांबरचा जन्म इथलाच. क्षितिजापर्यंत पसरलेला समुद्र आणि पालथ्या वाटीसारखे आकाश समोर; यामुळेच कदाचित त्याचे नाव नीलांबर ठेवलेले असेल. निदान त्याला तसे वाटे. तेवढाच आपल्या वडिलांचा काव्याशी संबंध.

नीलांबरचे हे घर बेलाहळ्ळीला होते. तो आणि कांचन वेळ मिळेल तेव्हा समुद्रकिनाऱ्यावर जात. तो किनारा त्याचे सर्व काही होते. खेळाचे मैदान, पाठांतराची जागा, वेळ घालवायची जागा. हल्ली त्याला एकटे जाण्याचीही परवानगी होती.

"आज नको. आधीच उशीर झालाय. तू आणि कांचन गावातल्या मंदिरात जाऊन या." आई म्हणाली.

"हे ठीक आहे," असे म्हणून पप्पा बाहेर पडले आणि नीलांबरने बाहेर जाण्याचा हट्ट धरला.

मथूआजी सावकाश परत येताना दिसली, तेव्हा तो तिच्याकडे पळाला. "संपली गोष्ट?"

तिने मान हलवली, तसा तो खट्टू झाला. 'मला रात्री पुन्हा सांग, म्हणत त्याने तिचा हात धरला.

"आपण बीचवर जाऊ," तो म्हणाला.

"आज नको रे," आजी म्हणाली.

"बरं, मग शिवालयात येतेस का?" त्याने विचारले.

आजीला मंदिरात येण्याचा मोह हाणार हे त्याला पक्के माहीत होते.

"जाऊ बाबा." त्या म्हणताच त्याने घरातल्या बायकांना बाहेर काढलेच.

शिवालय नुकतेच बांधले हाते. ते समुद्राला सन्मुख हाते. बेलाळ्ळीपासून लाईट हाऊसकडे जाणारा मोठा रस्ता होता. गावातला मोठा मेन रोडही होता म्हटलं तरी वालेल. तिूनच आत अनेक रस्ते गेलेले होते. हा रस्ता समुद्रकिनारा आणि शिवालयामधून जात होता. थोड्या उंचावर शिवालय होते. आजूबाजूला राहती सुंदर वस्ती होती. मोठमोठे बंगले, काही उंच इमारतीही होत्या. एवढा मोठा समुद्रकिनारा क्वचितच एखाद्या गावाला लाभलेला असेल किंवा किनाऱ्यावर एवढी पसरट वसाहत म्हणा.

मंदिराच्या पायऱ्यांवर सगळे बसले. प्रशस्त ग्रेनाईटच्या पायऱ्या, सुंदर मोठे मंदिर, संध्याकाळचे ऊन संपले होते. संधिप्रकाशात समोरचा समुद्र अतिशय सुंदर दिसत होता. उसळणाऱ्या, फेसाळत उंच वळणाऱ्या लाटांनी निलांबर वेडा व्हायचा. जवळच धक्का असल्याने काही बोटी

दिसायच्या. जसेजसे थोडेसे अंधारायला लागले, तसा तो उठला. तो आणि कांची बीचवर आले. जहाजावर फिकट लाईट चमकत होते. कुठून तरी आकाशातून छोट्या प्रवाहासारखे प्रकाशझोत पडत होते.

"कांची, ताई, बघ देव आकाशाच्या छोट्या फटीतून बघतोय..." तो आनंदात होता.

"कसं वाटतंय ना? जसे काही पिवळे, केशरी, सोनेरी झरे आकाशातून थेट पाण्यात येऊन मिसळताहेत." कांचन अनिमिष नेत्रांनी समुद्राकडे पाहत होती.

दोघांनी पाण्यात पाय बुडवून यायचे ठरवले.

कांचन पुढे चालत गेली. तिने सलवार वर धरली. तिचे मोकळे केस उडून चेहऱ्यावर येत होते. संध्याकाळच्या प्रकाशातही तिचा चेहरा उठून दिसत होता. चालता, चालता निलांबर थांबला. आपल्या अत्यंत सुंदर बहिणीकडे पाहताना त्याला वाटले ही आजीच्या गोष्टीतली परीच आहे.

"काय पाहतोस रे चल ना," ती म्हणाली, तसा तो हसला.

तेवढ्यात मोठी घोंघावती लाट आली. लाट अचानक आली. कांचनला अर्थातच अपेक्षित नव्हती. तिच्या पायाखालची वाळू सरकली. समुद्रात हेलपटत ओढल्यासारखी ती झाली. बाजूला फोटो घेणारा एक माणूस धावला. तेवढ्यात ती सावरली. 'ठीक आहे. थँक्यू,' ती म्हणाली.

"आता एकदम एवढी लाट कशी उठली? गेला तासभर मी इथे आहे. सगळं नेहमीसारखं होतं."

कांचन किनाऱ्याच्या ओल्या वाळूवर उभी होती. समोरचा समुद्र एकदम उफाळल्यासारखा झाला होता. लाटा उसळत होत्या. फेसाळत किनाऱ्यावर आदळत होत्या. समुद्रफुलांच्या पांढऱ्या शुभ्र माळाच जणू तयार होत होत्या आणि किनाऱ्याला घालत होत्या.

नीलांबर अनिमिष डोळ्यांनी या चमत्कारिक प्रकाराकडे पाहत होता. तेवढ्यात आई आली. तिने कांचीला पाहिले होतेच.

"संध्याकाळच्या वेळी समुद्रात गेलेलं आवडत नाही मला. बरं तर बरं नाही तर काय वैताग झाला असता!" वरपर्यंत भिजलेल्या कांचीला पाहत त्या म्हणाल्या. "आज मात्र मी सटपटले होते. लाट थेट डोक्यापर्यंत आली होती. तोल सावरला म्हणून ठीक," कांचन म्हणाली.

रात्री आजीकडून पुन्हा गोष्ट ऐकताना नीलांबर म्हणाला, "आजी तुझा तो दरबारातला सागर म्हणजे आपला समुद्र का गं?"

''माहीत नाही बाबा. जगात एवढ्या विचित्र गोष्टी आहेत, की, काही सांगता येत नाही. एवढं पिकलं पान झालंय माझं; पण कित्येक गोष्टी का अन् कशा होतात हे कळत नाही. निसर्ग मोठा विचित्र आहे बाबा. तो आपल्याशी दयाळूपणानं वागतो. आपली काळजी करतो हे म्हणणं तर मलाही पटत नाही. तो अलिप्त आहे. राक्षसी आहे आणि आपल्याशी संबंधित नाही. आपण मात्र... संबंध लावतो. सगळ्या घटना कशा घडतात कळत नाही,'' आजी म्हणाली.

''पण पप्पांना कळतात ते सारखे शास्त्रीय कारणं सांगतात हो ना?''

''पप्पा हुशार आहे तुझा. समुद्रावरला धक्का बांधला तेव्हा केवढा फुशारला होता. मोठा विजयच मिळवला जसा ! आहे माणूस हुशार. करतोय काम, शोधतोय कारणं. पिढीमागून पिढी यात गेलीय. हं काय हाती लागलंय?,'' आजी उसासली.

''का तुझ्या देवासारखी माणसं आपल्या टीव्हीवर अवतरतात की! तूच तर म्हणालीस, की तुकाराम विमानातून गेले. वर म्हणे विमान असेलच तेव्हा आणि सुभाषचंद्र बोसांसारखं विमानातच बेपत्ता झाले असतील. मग लोकांना वाटलं की ते सदेह गेले,'' नीलांबर म्हणाला.

आजी हसली. म्हणाली,

''झोप नील आता. मी म्हातारी आपली बसल्या बसल्या मागच्या-पुढच्या गोष्टींचा संदर्भ लावते. साखळ्या जोडत बसल्यासारखी. मग पुराणातले संदर्भ लागतातही.''

कांचन एकदम मध्येच म्हणाली,

''आपल्या महाभारतात कुंतीला सूर्यापासून मुलगा झाला ना तशी 'डब्लू बी यिटसची' कविता आहे आज्जी. सूर्यदेव म्हंजे इंग्रजीत त्याचा झीअस असा उल्लेख आहे. हा राजहंसाच्या स्वरूपात येतो आणि लिडाला त्याच्यापासून हेलन नावाची मुलगी होते... मलासुद्धा कविता वाचताना असंच वाटलं. पंचतत्त्वांपासून पुत्र प्राप्ती. हो ना गं ?''

''मला सांग तू ही गोष्ट उद्या.'' नीलांबरचे डोळे जड झाले होते तरी गोष्टीची आवड झोप घालवत होती. ''नाही तर आता सांगतेस का?''

''छे, रे वेडोबा आहेस तू,'' कांचन म्हणाली.

''उद्या सांगेल ती गोष्ट अन् कांचन, एक गोष्ट सांगते. आपला नील वेगळाच पोरगा आहे. इतर मुलं पाहते मी; पण हे बेणं जरा वेगळं वाटतंय

खरं.'' आजी म्हणाली.

उठून बसत नीलांबर कांचनला म्हणाला,

''बघ ताई! माझी कॉलर वर!''

दुसऱ्या दिवशीच्या रात्री हवामानाच्या अंदाजात खाली दक्षिणेला समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यामुळे किनारपट्टीवर पावसाचा अंदाज सांगितला. पट्टा किती वेगाने पुढे येतोय ते सांगितले. पप्पा म्हणाले,

''झालं! आता पुन्हा हा अवकाळी पाऊस. धक्क्यावर एक युरोपीय टीम येणार आहे बघायला. तेव्हा पाऊस नसला म्हणजे बरं! तरी केवढे पुढारलो आपण! सगळ्या गोष्टी आधी कळतात.''

''केव्हा येणार हे प्रतिनिधी ? जेवण आहे का आपल्याकडून?''

आईने बाईसारखा प्रश्न विचारला.

''पुढच्या आठवड्यात. जेवण तिथेच आहे. आपण सगळे जाऊ. आई थांबेल घरी,'' पप्पा म्हणाले.

दुसऱ्याच दिवशी अंधारा दिवस. ढग भरून आलेले आणि धो-धो पाऊस सुरू. किनारपट्टीवरच्या लोकांना हे नवीन नसले, तरी हवामान खात्याला कलाटणी देऊन पाऊस दारातच हजर. म्हणजे एकूणच त्रेधा.

आठवडाभर पाऊस उघडायचं नाव घेत नव्हता. कांची, नील चार दिवस शाळा-कॉलेजातही जाऊ शकले नव्हते. पाऊस, मग प्रचंड गरमी. पुन्हा पाऊस. नीलांबर खिडकीत बसून झाडांना झपकणाऱ्या पावसाची मजा लुटत होता. मध्येच कडकडाट, मध्येच विजा लवायच्या. गरम जेवण आणि सुटी.

आठव्या दिवशी पाऊस उघडला. रोज नियमाने पप्पा हवामानाचा अंदाज पाहायचे.

त्यांची टीम येण्याआधी पाऊस विसावला.

पप्पाही निश्चिंत झाल्यासारखे झाले. ढग होते, तरी बुरबुरीच्या पुढे पाऊस गेला नाही.

मग पप्पांची, त्यांच्या ऑफिसच्या लोकांची धावपळ सुरू झाली. जीपमध्ये कधी तरी नीलांबरही धक्क्यावर जाऊन आला.

त्याच्या नेहमीच्या पद्धतीने तो पप्पांना म्हणाला,

''पप्पा, समुद्राच्या इतक्या जवळ असं बांधकाम टिकतं का हो?''

''हो तर. पूर्ण कॅलक्युलेशन्स करून, विचार करूनच म्हणजे शास्त्रशुद्ध

विचार करून हे बांधलंय. हा निसर्गाला घातलेला लगाम आहे. आपला माणसाचा विजय आहे. केवढ्या रुद्र शक्तीला रोखून धरलंय बघ.''

''पण या एका बाजूला समुद्र फार जवळ नाही ?''

''या उतारावरून बीचवरही जाता आलं पाहिजे ना. या प्रकल्पाची हीच तर गंमत आहे. खाडीसारखं शांत पाणी एकीकडे आणि एवढा एकच सुळक्यासारखा जमिनीत घुसलेला समुद्र. गेली पंधरा वर्षे लोक पहायला येताहेत.''

दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी ती पाहुणे मंडळी आली. एक जेवण मोठ्या हॉटेलमध्ये झाले. सगळ्यांच्या ओळखी झाल्या. नीलांबरला लिंबू-टिंबू समजून सगळे त्यांच्याशी बोलत होते. त्याच्या डोक्यावर थापटत होते. कांचनकडे पाहून मात्र प्रत्येक जण पप्पांना 'काय सुंदर मुलगी आहे तुमची?' म्हणत अभिनंदन करत होते. नुकतीच कॉलेजात जायला लागलेली कांचन अशा स्तुतीने संकोचत होती.

दुसऱ्या दिवशी सगळे लाइट हाऊसला गेले. सकाळी गावात शॉपिंग झाले होते. आलेल्या विदेशी लोकांना समुद्र नवा नव्हता; पण देश नवा, वस्तू नव्या, शहर नवं, खेडंही नवं. त्यांना शिवालय अप्रतिम वाटले होते. फोटो घेणे चालू होते. उन्हाने काळे पडणे आवडत असले तरी चटके असह्यच होत होते.

पाचच्या सुमारास ते पुन्हा बाजूच्या बीचवर गेले. समुद्राचे निळेशार पाणी, कोरडी बारीक वाफ, पाण्यावर चमकणारे प्रकाशाचे तुकडे, उतरते ऊन, आर्द्रता. काहींनी समुद्रस्नानाचा बेत जाहीर केला. काही किनाऱ्यांवर रेतीत बसून समुद्राकडे पाहत गप्पा मारू लागले. कांचन, आई आणि दोन प्रतिनिधींच्या बायका गप्पा मारत-मारत बीचवर आल्या. फिक्या गुलाबी रंगाच्या ड्रेसमध्ये कांचन अतिशय सुरेख दिसत होती, तिची ओढणी वाऱ्याने फडफडत होती. वाऱ्यामुळेच कपडे अंगाला चिकटून तिची शरीराकृती एखाद्या कलाकाराच्या पुतळ्यासारखी उठून दिसत होती. डोळे सौम्य उन्हात चमकून उठत होते. तिने पायातल्या चपला काढल्या. नीलांबर तिच्या गोऱ्या गोमट्या पायांकडे पाहत होता. ओल्या पायांवर बारीक वाळूने नक्षी रेखली होती. पप्पांचे मित्र हाय बेबी, हाय ब्यूटी म्हणत तिला चिडवत होते... आणि एकाएकी ऊन गेले. आभाळ काळसर झाले. वारा जोराने वाहायला लागला.

वातावरणातला बदल पप्पांना जाणवला. ते म्हणाले, ''चला-चला चटकन आडोशाला चला. कदाचित पाऊस येईलही. तेवढ्यात टपोरे थेंब यायलाही लागले. सगळ्यांची धावपळ उडाली. पळत-पळत सगळे समुद्रापासून दूर पळायला लागले.

नीलांबर चुणचुणीत होता. पळून तो टेकडीवर जाऊन थांबला.

समुद्रात मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या. पाण्याचा निळेपणा नाहीसा होऊन गडद काळसर रंग आला. गमतीने निलांबर हसला. असा समुद्रही त्याला आवडे, पण लाटांची संख्या वाढली. किनाऱ्यावर फेसाळत आदळणाऱ्या लाटा आता जास्त फेसाळत, व्याप्ती वाढवत पसरू लागल्या. वितळून परत जाणाऱ्या लाटा न पसरता कल्लोळ करीत किनाऱ्याकडे येऊ लागल्या.

नीलांबरने पाहिले. कांचनच्या चपला वाहून गेल्या होत्या. अनवाणी पायांनी बांधून ठेवल्यासारखी ती एका जागेवर उभी होती. तिचे केस उडत होते. तिच्याकडे पाहत तो तिच्या नावाने ओरडला, ''पळ कांची पळ.''

तिने मागे वळून पाहिले.

तेवढ्यात एक अवाढव्य प्रचंड लाट उसळली. काही कळायच्या आत ती लाट उंच पायावर उभी राहिल्यासारखी उभी राहिली. एखादा नाग फणा काढून शेपटावर उभा राहतो, तशी काळसर, मातकट लाट.

क्षणात त्या लाटेने किनाऱ्यावरच्या सगळ्यांना गिळून टाकले.

काळ्या थेंबासारखे त्यांच्यातले चार-पाच जण समुद्राने खेचून ओढून घेतले. कधी त्यांचे हात, पाय, कधी डोळे बुडताना दिसले. एकच हलकल्लोळ उडाला. किनाऱ्यावरचे मच्छीमार आणि त्या आलेल्यांपैकी काही गटांगळ्या खाताना दिसले आणि नाहीसे झाले.

आरोळ्यांचे काहूर उठले. प्रत्येकजण जमेल तसे, जमेल तेवढ्या मोठ्या आवाजात ओरडत होते. टेकडीला चिकटल्यासारखा नीलांबर स्तंभित, भयभीत उभा होता. गोंधळ, आवाज आणि पावसाच्या माऱ्यामध्ये तो घाबरून नुसताच ओरडत होता. त्याच्या घशातून आवाज येतोय का, त्याला कळत नव्हते.

मोठ्या भयचकित डोळ्यांनी समुद्राचे तांडव तो पाहत होता.

क्षणात त्याला जाणवली, ती कांचन. समुद्रातून एक-एक सरसर

करीत वेगात येणारी लाट कांचनच्या भोवती वेटोळे देत होती आणि तिला चाटून जाऊन मागे सरकत होती. मृत्यूच्या त्या अफाट रणकंदनात पाय रोवलेली कांचनची काळसर आकृती दिसत होती. तिला लाटा लपेटत होत्या आणि मागे सरकत होत्या. एखाद्या प्राणप्रिय वस्तूला तळव्यात जपावे, तशा तिच्याभोवती वेढा घालून निचरत होत्या. मंत्रमुग्ध, काहीही न कळून ती होती तिथेच उभी होती.

नीलांबर एकीकडे समुद्राच्या रौद्र, राक्षसी जबड्याकडे पाहत होता आणि नंतर कांचनकडे, दुसऱ्या क्षणी त्या जागेवर कुणी नव्हते.

त्याने डोळे गच्च मिटून घेतले. भीतीने तो गोठून गेला होता. त्याच्या मिटलेल्या डोळ्यांपुढे वीज कडाडून चमकली तसा विचार चमकला. स्वर्गातली ती शापित परी आणि प्रेमभरानं तिचे प्रणयाराधन करणारा सागर. अलिप्त निसर्गाच्या त्या चमत्काराचा तो साक्षी होता.

यातले कुणाला काहीच कळणार नव्हते..

''नीलऽऽ नील, कांचन कांची....'' आईचा ओरडून विव्हळ झालेला आवाज त्याच्या कानावर पडला. पप्पा भांबावून वेड्यासारखे त्या घोंघावत्या लाटांकडे पाहत विषण्णपणे उभे होते. नुसतीच धावपळ, हातातून सुटून गेलेल्या मऊ वाळूसारखी वाहून गेलेली माणसं. एक भयाण पोकळी...!

एका भीषण प्रसंगानंतरही हताश, हतबलता.

''आपण कितीही त्याला आपला म्हणा तो निसर्ग आपला नाही, तो अलिप्त आहे,'' आजी म्हणाली होती.

कोणीही शुद्धीवर असल्यासारखं वाटत नव्हतं. प्रत्येक जण आपल्या आप्ताला शोधीत होता.

''लहान आहे अजून तो,'' आई नीलांबरबद्दल म्हणाली होती. तो-मात्र एका क्षणात कितीतरी अनुभवी झाला होता.

समुद्राकडे पाठ करून बधिर मनाने तो टेकडी उतरू लागला आणि आक्रोशाला सामोरा झाला.

❄ ❄ ❄